
Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA



Volume-VIII, Issue-IV
October - December - 2019
MARATHI PART - III /
HINDI

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

Scanned with CamScanner

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VIII Issue - IV October - December - 2019

MARATHI PART - III / HINDI

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

Scanned with CamScanner

The information and views expressed and the research content published in this journal, the sole responsibility lies entirely with the author(s) and does not reflect the official opinion of the Editorial Board, Advisory Committee and the Editor in Chief of the Journal **"AJANTA"**. Owner, printer & publisher Vinay S. Hatole has printed this journal at Ajanta Computer and Printers, Jaisingpura, University Gate, Aurangabad, also Published the same at Aurangabad.

**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

Cell No. : 9579260877, 9822620877, 7030308239 Ph. No. : (0240) 2400877

E-mail : ajanta5050@gmail.com, www.ajantaprakashan.com

**AJANTA - ISSN 2277 - 5730 - Impact Factor - 6.399** **(www.sjifactor.com)**

Scanned with CamScanner

# EDITORIAL BOARD


**Professor Kaiser Haq**
Dept. of English, University of Dhaka,
Dhaka 1000, Bangladesh.

**Roderick McCulloch**
University of the Sunshine Coast,
Locked Bag 4, Maroochydore DC,
Queensland. 4558 Australia.

**Dr. Ashaf Fetoh Eata**
College of Art's and Science
Salmau Bin Adbul Aziz University. KAS

**Dr. Nicholas Loannides**
Senior Lecturer & Cisco Networking Academy Instructor,
Faculty of Computing, North Campus,
London Metropolitan University, 166-220 Holloway Road,
London, N7 8DB, UK.

**Muhammad Mezbah-ul-Islam**
Ph.D. (NEHU, India) Assot. Prof. Dept. of
Information Science and Library Management
University of Dhaka, Dhaka - 1000, Bangladesh.

**Dr. Meenu Maheshwari**
Assit. Prof. & Former Head Dept.
of Commerce & Management
University of Kota, Kota.

**Dr. S. Sampath**
Prof. of Statistics University of Madras
Chennari 600005.

**Dr. D. H. Malini Srinivasa Rao**
M.B.A., Ph.D., FDP (IIMA)
Assit. Prof. Dept. of Management
Pondicherry University
Karaikal - 609605.

**Dr. S. K. Omanwar**
Professor and Head, Physics,
Sat Gadge Baba Amravati
University, Amravati.

**Dr. Rana Pratap Singh**
Professor & Dean, School for Environmental
Sciences, Dr. Babasaheb Bhimrao Ambedkar
University Raebareily Road, Lucknow.

**Dr. Shekhar Gungurwar**
Hindi Dept. Vasantrao Naik
Mahavidyalaya Vasarni, Nanded.

**Memon Sohel Md Yusuf**
Dept. of Commerece, Nirzwa College
of Technology, Nizwa Oman.

**Dr. S. Karunanidhi**
Professor & Head,
Dept. of Psychology,
University of Madras.

**Prof. Joyanta Borbora**
Head Dept. of Sociology,
University, Dibrugarh.

**Dr. Walmik Sarwade**
HOD Dept. of Commerce
Dr. Babasaheb Ambedkar Marathwada
University, Aurangabad.

**Dr. Manoj Dixit**
Professor and Head,
Department of Public Administration Director,
Institute of Tourism Studies,
Lucknow University, Lucknow.

**Prof. P. T. Srinivasan**
Professor and Head,
Dept. of Management Studies,
University of Madras, Chennai.

**Dr. P. Vitthal**
School of Language and Literature
Marathi Dept. Swami Ramanand
Teerth Marathwada University, Nanded.


Scanned with CamScanner

# CONTENTS OF MARATHI PART - III / HINDI


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | जागतिकीकरणाचे कृषी अर्थव्यवस्थेवरील परिणाम<br>**प्रा. अशोक ताराचंद बावणे** | १-३ |
| २ | भारतीय कृषी क्षेत्राचे आर्थिक विकासात योगदान<br>**प्रा. अविनाश दिवाकर भुरसे** | ४-६ |
| ३ | महात्मा गांधी यांची ग्रामस्वराज्याची परिकल्पना<br>**डॉ. बी. आर. कत्तूरवार** | ७-९ |
| ४ | भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राचे योगदान<br>**प्रा. राजेश एस. डोंगरे** | १०-१२ |
| ५ | ग्रामस्वराज्य गांधीजींची ग्रामीण विकासाची परिकल्पना<br>**डॉ. विभावरी बा. हाते** | १३-१५ |
| ६ | शेतकरी आत्महत्या आणि त्यावरील प्रतिबंधात्मक उपाय<br>**ईश्वर वाघ** | १६-२१ |
| ७ | शेतकरी आत्महत्या कारण आणि उपाय एक अभ्यास<br>**पडोळे कोंडीबा रमेश** | २२-२६ |
| ८ | ग्रामीण आदिवासी महिला समाजाचा विकास एक दृष्टीकोण<br>**कु. कविता रंजन लोखंडे** | |
| ९ | शेतकरी आत्महत्या आणि त्यावरील प्रतिबंधात्मक उपाय<br>**प्रा. महेन्द्र जानकीराम चव्हाण** | ३२-३६ |
| १० | भारताच्या कृषीप्रधान अर्थव्यवस्थेवर जागतीकीकरण आणि भांडवलशाहीचा परिणाम<br>**महेंद्र शांताराम साबळे** | ३७-४० |
| ११ | सुदृढग्रामीण अर्थव्यवस्थेची नाळ: लघु व कुटिर उद्योग<br>**डॉ. सौ. मंजूषा रा. ठाकरे** | ४१-४५ |
| १२ | शेतकरी आत्महत्या व त्यावरील प्रतिबंधात्मक उपाय एक अध्ययन<br>**मोहन विलास चुकाबोटलावर** | ४६-५१ |
| १३ | भारतातील ग्रामीण विकास - एक मूल्यमापन<br>**प्रा. डॉ. संजय कांबळे** | ५२-५५ |




Scanned with CamScanner

# ६. शेतकरी आत्महत्या आणि त्यावरील प्रतिबंधात्मक उपाय

ईश्वर वाघ

**सारांश**

भारतीय अर्थव्यवस्था ही कृषीप्रधान अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते. आर्यांनी भारत भूमीवर निवास करण्यास सुरुवात केल्यापासून कृषी हा अर्थव्यवस्थेचा आधारस्तभ राहिला आहे. मानवाच्या सभ्यतेचा विकास शेतीमधून झाला आहे. नद्याच्या सूपीक खोऱ्यात वसलेलया वस्त्यांचे रुपांतर मोठया शहरामध्ये झाले. शेतीच्या ठिकाणी मोठ मोठया इमारती उभ्या राहील्या. कृषीक्षेत्राची जागा हळूहळू औद्योगक व सेवाक्षेत्राने घेतली. त्यामुळे औद्योगिकता व त्यावर आधारलेल्या अर्थव्यवस्थेचे युग साकारले. स्वातंत्र्यानंतरच्या कृषी योजनाचा लाभ मोठया धनी शेतकऱ्यांना मिळाला. वाढती लोकसंख्या, अपूरी जमीन, अज्ञान, संघटीतपणाचा अभाव, महागाई, आधुनिकतेचा अभाव या सर्वांमुळे शेतकऱ्यांमध्ये व्यावसायिक उदासिनता वाढली. त्यामुळे शेतकऱ्यामध्ये आत्महत्येच्या सत्राला सुरुवात झाली. यामध्ये प्रामुख्याने विदर्भातील शेतकऱ्यांनी सर्वात जास्त आत्महत्या केल्याचे दिसून येते. २००३ ते २०१३ या कालावधीत विदर्भामध्ये ८९७४ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे दिसून येते.

निसर्गाने अतिवर्षाव, अवर्षणासारखी संकटे लावून शेतकऱ्याला हतबल केले. परंपरागत ग्रामोद्योग हस्तोद्योग यांचाऱ्हास झाल्यामुळे अर्थव्यवस्था दिशाहीन बनली. दिवसेंदिवस वाढत चाललेला उत्पादन व्यय, कर्जबाजारीपणाच्या समस्या व शासनाचा उदासिन दृष्टीकोन यामुळे शेतकऱ्यांमध्ये निराशावादाची भावना निर्माण झाली. याशिवाय शासनाने शेतमालाच्या आधारभूत किंमती, पिकविमा, जलसुविधांचा विस्तार याविषयी दिशाभूल केली. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या प्रमाणात वाढझाली. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना उचित दिशा मिळ्यायला हवी पोषणमुल्ये असणारा आहार मिळणारे धान्य, उत्पादन फलोत्पादन व पैसा मिळवून देणारी शेती उत्पादने यांचे सामजस्यं असणारे नियोजन शेतीत व्हायला हवे. शेती + औद्योगिकता + बाजारपेठ + निर्यात धोरण + विकास कार्ये या सर्वांचा समन्वय साधणारी धोरणे बनवली पाहिजे. विदेशात शेती व औद्योगिकता जोडीने हातात हात घालून प्रगत होतात. मग भारतात या बाबींना का विरोध व्हावा? आज शेती व्यवसायाची संपूर्ण संरचना व मानसिकता बदलल्याशिवाय शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविता येणार नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचा सर्पतोपरी विकास करण्याच्या दृष्टीकोन घेवून अर्थव्यवस्थेची वाटचाल करण्याची आज नितांत गरज आहे.

**प्रस्तावना**

प्राचीन काळापासून तर वर्तमान काळापर्यंत भारतीय अर्थव्यवस्थेची ओळख कृषीप्रधान अर्थव्यवस्था म्हणून आहे. जेव्हा लोकसंख्या अत्यंत कमी होती किंवा आर्यांनी भारत भूमीवर निवास करण्यास प्रारंभ केला होता, त्यावेळेपासून लोकांच्या उपजिविकेचे साधन कृषी हेच होते. मनुष्य स्वत: शेती करुन आपले व पशुचे पालन करीत होता. जस जशी लोकसंख्या वाढत गेली तशी शेती कार्याला गती मिळाली आणि येथूनच

शेतकऱ्यांचा समस्यामध्ये वाढ व्हायला सुरुवात झाली. शेतकऱ्यांचा महिमा सर्वत्र प्राचीन ग्रंथामध्ये आढळून येतो. ऋग्वेदाचे भाष्य लिहिताना 'ब्रम्हणस्पती' शब्दाची फोड करुन सायणाचार्य सांगतात ''ब्रम्हणः अन्नस्य परिवृधस्य कर्मणः पतिः पालपिता''. अन्नाची उत्पत्ती करुन आपल्या कार्याद्वारे सृष्टीचे पालन करणारे शेतकरी 'ब्रम्हरुप अन्नाचे स्वामी' होत. मानवाच्या सभ्यतेचा विकास शेतीतून झाला आहे. नद्यांच्या सुपीक खोऱ्यात वसलेल्या वस्त्याचे रुपांतर गावात, गावाचे रुपांतर नगरात झाले. शेती व शेतकरी यांच्या गरजातून कारागीर, पूरक व्यावसायिक निर्माण झाले. पशु व धान्य विनिमयाची साधने बनली. शेतकरी हा अन्नदाता बनला. त्याने गरजेनुसार निसर्गाच्या उत्पादन क्षमतेचा विकास केला. वेगवेगळया धान्यांचे तेलबियांचे, वनस्पतींचे उत्पादन वाढविले. उत्पादन आणि जगण्याचा अन्न, वस्त्र व निवारा यांचा संबंध दृढ करण्याचे कार्य शेतकऱ्याने केले. त्यानेच मानवी आहाराची पोषणमुल्ये ठरविली. म्हणून भारतभूमीत शेतकऱ्याला 'अन्नदाता किंवा सर्जक' म्हणून देवत्व प्रापत झाले.

परंतु आधुनिक काळातील शेतकऱ्याविषयीचे चित्र मात्र अत्यंत दयनीय आहे. भारतीय शेती आणि त्यावर अवलंबून असलेला शेतमजून व शेतकरी याची होत असलेली ससेहोलपट थांबविणे आवश्यक आहे. गेल्या अनेक वर्षापासून शेतकऱ्यांच्या आत्महत्याचे सत्र सुरु आहे. कारण निसर्गाचा लहरीपणा, सरकारच दुर्लक्षितपणा, सध्याचे कृषिविषयक धोरणे, शेतकऱ्यांचा शेतीकडे पाण्याचा पारंपारीक दृष्टीकोन, तुटपूंजी मदत या सर्व बाबीमुळे शेतकरी आत्महत्येसारखा पर्याय निवडतो. यावर ठोस पर्याय काढण्याची आज गरज निर्माण झाली आहे.

**शोधनिबंधाचा उद्देश**

प्रस्तूत शोधनिबंध खालील उद्देश समोर ठेवून तयार केलेला आहे.

१. शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या कारणांचा शोध घेणे.

२. शेतकऱ्यांचा शासनाविषयीचा दृष्टीकोन जाणून घेणे.

३. शेतकऱ्यांच्या आत्महत्येवरील प्रतिबंधात्मक उपाय सूचविणे.

**शोधनिबंधाचे गृहितके**

''शेती उत्पादनाचा वाढता खर्च, सरकारचे वेळ खाऊ धोरण व निसर्गाचा लहरीपणामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्येत वाढ.'' होते

**शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे स्वरुप**

सध्या देशातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे चित्र अतयंत विदारक आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची सुरुवात १९८६ मध्ये केरळ येथे झाली. त्यानंतर त्याचे वादळ हळूहळू पंजाब, आंध्रप्रदेश, तामिलनाडू, महाराष्ट्र आणि कर्नाटकच्या शेतकऱ्यांनी अनुकरण केले. परंतु २००२ नंतरच्या कालखंडात विदर्भात जास्त शेतकरी आत्महत्या झाल्र्याचे दिसून येते. त्याची आकडेवारी खालील तक्त्यात दर्शविली आहे.

**विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या दर्शविणारा तक्ता**

| अ. क्र. | वर्ष | आत्महत्या | अ. क्र. | वर्ष | आत्महत्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | २००३ | १४८ | ७ | २००९ | १००५ |
| २ | २००४ | १४७ | ८ | २०१० | ७४८ |



Scanned with CamScanner

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | २००५ | ४४५ | ९ | २०११ | ९१८ |
| ४ | २००६ | १४४८ | १० | २०१२ | ९८८ |
| ५ | २००७ | १२४६ | ११ | २०१३ | ६१३ |
| ६ | २००८ | १२६८ | | | |

सध्या विदर्भावर मोठया प्रमाणावर कृषी संकट आले असून शेतकरी हतबल झालेला आहे. शासनाकडून कोणत्याही प्रकारे पुरेशी मदत मिळत नसल्याने तसेच बँकानी नवीन पीक कर्ज देण्यास नकार दिल्याने आणि सावकारांनी पाठ फिरवल्यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली व त्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्येत वाढझाली आहे.

**शेतकऱ्यांच्या आत्महत्येची कारणे**

शेतकऱ्यांच्या आत्महत्येला खालील कारणे जबाबदार आहेत.

**१) वाढता उत्पादन व्यय**

वर्तमानकाळात शेतीसाठी लागणाऱ्या आदानांच्या खर्चात मोठया प्रमाणात वाढझाली आहे. संकरित बि–बियाणे, रासायनिक खते, किटकनाशके, तंत्रज्ञानाचा वापर, मोठया प्रमाणावरील बिजाविल, यामुळे शेतीच्या उत्पादन व्ययात मोठया प्रमाणवर वाढझाली आहे. परिणामत: उत्पादन खर्च व उत्पादन यात फार मोठी तफावत निर्माण झाली.

**२) कर्जबाजारीपणा**

भारतीय शेतकरी कर्जात जन्म घेतो, कर्जात जगतो व वाढता भार यामुळे शेतकरी चिंताग्रस्त होतो शिवाय जुन्या कर्जाची परतफेड केल्याशिवय नवे कर्ज उपलब्ध होत नाही. त्यामुळे शेतकरी आपल्या कुटूंबांनेसुध्दा भरणपोषण करु शकत नाही. परिणामत: तो आत्महत्येकडे वळतो.

**३) आधारकिंमतीबाबत दिशाभुल**

शासनाकडून शेतमालाच्या आधारकिंमती जाहीर केल्या जातात. आधारकिंमत म्हणजेच शेतमालाच्या खरेदीविषयी शेतकऱ्यांना दिलेल्या हमीभावाची शाश्वती असते. परंतु सरकारने आधारभूत किंमती कमी ठेवून शेतकऱ्यांची दिशाभूल केली आहे.

**४) शेतीपूरक व्यावसायाचा अभाव**

भांडवलाची अडचण, बँकाचा अल्प पतपुरवठा, कागदपत्राचा गोंधळ यामुळे शेतीपूरक व्यवसाय संपुष्टात आले. त्यामुळे शेतकरी आपले कुटूंब, शेतीचा खर्च, कुटूंबाचा खर्च बँकाचे कर्ज यांची परतफेड करु शकत नाही. त्यामुळेच तो आत्महत्येकडे वळतो.

**५) उदारीकरणाचे धोरण**

१९९१ मध्ये भारतने सरकारने नवीन आर्थिक धोरण जाहिर करुन आर्थिक उदारीकरणाची प्रक्रिया स्विकारली. त्यामुळे उद्योग–धंद्यावरील व किंमतीवरील बंधने काढून टाकली. देशातील आर्थिक विकासाचा वेग वाढविण्यासाठी, सेवाक्षेत्राचा विकास करण्यासाठी खाजगी क्षेत्राला वाव देण्यासाठी कृषीक्षेत्र व ग्रामीण क्षेत्राकडे दुर्लक्ष करण्यात आले. यामध्ये सरकारने शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या अनुदानाचे प्रमाण कमी केले. परिणामी



Scanned with CamScanner

VOLUME - VIII, ISSUE - IV – OCTOBER - DECEMBER - 2019
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)**

कृषीक्षेत्राच्या उत्पन्नाच्या प्रमाणात उत्पादन खर्च वाढला. परिस्थितीमुळे आर्थिक अस्थिरता निर्माण होऊन शेतकरी आत्महत्येकडे वळला.

**६) निसर्गाचा लहरीपणा**

भारतात जलसिंचन सूविधेचा पाहिजे त्या प्रमाणावर प्रसार झालेला नाही. बहुतांश भारतीय शेती ही मान्सुनच्या हातात आहे. शेतकऱ्यांना कधी ओल्या दुष्काळास तर कधी कोरउया दुष्काळास सामोरे जावे लागते. त्यामुळे शेतकऱ्यांचे सतत नुकसान होते. म्हणून अनेक शेतकरी सततच्या नुकसानीला कंटाळून आत्महत्या करण्यास प्रवृत्त होतात.

**७) वंशपरंपरागत कर्ज**

ग्रामीण भागातील सामाजिक रुढी आणि परंपरा, बाजारातील दोष, नैसर्गिक आपत्ती, अज्ञानीपणा, सावकारांचा पगडा यांमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक शोषण होते. त्यामुळे तो कर्जबाजारी होतो. हे कर्ज वंशपरंपरेने स्थानांतरीत होते. त्यामुळेसुद्धा आत्महत्येत वाढ होत आहे.

**८) ग्रामीण उद्योगाचा ऱ्हास**

ग्रामीण भागातील लघु व कुटीर उद्योगांचा ऱ्हास हे कारण शेतकऱ्यांच्या सामाजिक आणि आर्थिक स्थितीचे विश्लेषण करण्यासाठी उपयुक्त ठरते कारण ग्रामीण उद्योग हे शेतकऱ्यांना आपला उदरनिर्वाह करण्यास एक उपयुक्त साधन आहे. परंतु या उद्योगाचा ऱ्हास झाल्यामुळे तयांच्यात बेरोजारी वाढली. उदरनिर्वाहासाठी व शेतीसाठी कर्ज घेण्याची गरज भासली. गरजाची पूर्तता करण्यासाठी कर्जाशिवाय अन्य कोणताही मार्ग उपलब्ध नसल्याने आत्महत्यासारखा मार्ग निवडला.

**९) प्रक्रिया उद्योगाचा अभाव**

शेतकालावर प्रक्रिया करणारे उद्योग नसल्याने शेतकऱ्यांना फार मोठी हानी सहन करावी लागत आहे. विदर्भातील संत्रा, कापूस, सोयाबीन, फुलशेती ही प्रमुख पिके आहेत. परंतु या पिकांवर प्रक्रिया करणारे येथे उद्योग नसल्यामुळे योग्य किंमत मिळत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होते.

**१०) कर्जाचा अनुत्पादन कार्यासाठी वापर**

भारतील शेतकरी रुढी, परंपरा, प्रथा पाळणारे आहेत. लग्नकार्य, बारसे, अत्याविधी, सन—उत्सव अशा कार्यावर आपल्या ऐपतीपेक्षा जास्त खर्च करतात. त्यामुळे शेतीसाठी घेतलेले कर्ज व इतर कर्ज अशा अनुत्पादक कार्यावर खर्च केले तर अशा अनुत्पादक कर्जामुळे शेतकरी दिशाहीन बनुन आत्महतयेस प्रवृत्त होतो.

**शेतकरी आत्महत्येवरील प्रतिबंधात्मक उपाय**

शेतकऱ्याच्या आत्महत्या हा एक गंभीर स्वरुपाचा विषय आहे. यावर ठोस उपाय शोधणे काळाची गरज आहे. सध्या शेतकरी आत्महत्या थांबविण्यासाठी खालील प्रतिबंधात्मक उपाय सूचविता येतात.

**१) उत्पादन खर्चानुसार हमीभाव**

शेतकऱ्यांच्या शेतमालाला उत्पादन खर्चानुसार किंमत मिळणे अतयंत आवयक आहे. जर उत्पादन खर्चापेक्षा जास्त किंमत मिळाली तर त्याचा नफा वाढेल. त्यामुळे आत्महत्या करण्याचा प्रश्नच निर्माण होणार नाही.

Scanned with CamScanner

**२) सिंचन सुविधांचा विस्तार**

भारतामध्ये सिंचन सुविधेवर फारसा खर्च होत नसल्याचे दिसून येते. शिवाय अनेक सिंचन प्रकल्प अपूरे आहेत. हे प्रकल्प पूर्ण करण्यासठी राजकीय इच्छाशक्तीचा अभाव दिसून येतो. त्यामुळे सिंचनसुविधांचा विस्तार करुन शेतकऱ्यांचा उत्पादनात वाढ कणे हे शेतकऱ्यांच्या आत्महत्येवरुन प्रभावी अस्त्र आहे.

**३) शेती पूरक व्यवसायांना प्रोत्साहन**

शेतकऱ्यांचे शेतीवरील अवलंबित्व कमीकरण्यासाठी तसेच नापिकीच्या काळात उत्पन्नाचा आधार देण्यासाठी शेती पूरक व्यवसायाला प्रोत्साहीत करावे. दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन, शेतीपालन पापळ उद्योग सारख्या व्यवसायांना पालना द्यावी. त्यामुळे शेतकरी कुटूंबाला उत्पन्नाचा आधार मिळून लाभ उचलता येईल.

**४) सुलभ दराने कर्ज पुरवठा**

सवकारी पाशातून मुक्त करण्यासाठी व योग्य वेळेवर शेतीचा खर्च भागविण्यासठी राष्ट्रीयकृत व इतर बँकानी अल्प व सुलभ व्याजदरावर कर्ज पुरवठा करावा. तरच शेतकऱ्यांच्या आत्महत्येत आपोआप घट होईल.

**५) समूहशेती विकासाला गती**

समूह शेती विकासाला गती असेल म्हटले जाते. समूह शेतीमुळे प्रत्येक शेतकऱ्यावरील आर्थिक भार कमी होतो व सहकार्याची भाना प्रबळ होते. तसेच उत्पादन व उत्पन्न वाढीला चालना मिळून आत्महत्येचे प्रमाण कमी होवू शकते.

**६) शेतमाल विक्रीची सामूदायिक व्यवस्था**

बाजारव्यवस्थेतील स्पर्धात्मक वातावरणाचा फायदा शेतकऱ्यांना मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी एकत्र येण्याची गरज आहे या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय कृषी धोरणामध्ये, कृषी विस्ताराबाबत क्रांतीकारक बदल करण्याची जाब प्रकर्षाने समोर आली आहे. त्यामुळे शेतमाल विक्रीची सामुदायिक व्यवस्था निर्माण केल्यास शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यात यश येईल.

**७) जीवनविमा आणि पीक विमा**

..जे शेतकरी कुटूंब हे आपले साधारण जीवन जगू शेत नाही किंवा ज्यांना निसर्गाच्या व शासनाच्या दयेवर जगावे लागते. त्यांना जीवनविमा व पिकविमा शासनाने उपलब्ध करुन देण्याची गरज आहे. कोणत्याही परिस्थितीत (ओला दुष्काळ व कोरडा दुष्काळ) शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये. त्यांना त्याच्या नुकसानीची त्वरील भरपाई मिळावी यासाठी पिकविमा काढणे अत्यंत गरजेचे आहे.

**८) शेतकऱ्यांमध्ये जागरुकता**

बरेच शेतकरी हे अशिक्षित व अज्ञानी असतात त्यांना शासकीय योजना, आधुनिक बदल यांची फारशी माहिती नसते. अशावेळी शेती विकास, बचत गट, बँकिंग सेवा, विमा योजना, सिंचन सुविधाचा वापर, अनुदान इत्यादी घटकांविषयी शेतकऱ्यांमध्ये जागरुकता आणण्याची आवश्यकता आहे.

**९) साठवणूक सोयींचा विकास**

शेतमालाच साठवणुकीचा व बाजारभावाचा फार जवळचा सहसंबंध आहे. शेतमाल साठवणुकीच्या सोयींमुळे शेतकऱ्यांना आपला माल योग्यवेळी बाजारपेठेत विकता येते. त्यामुळे त्याला वाढत्या किंमतीचा



Scanned with CamScanner

फायदा उचलता येतो. म्हणून शासकीय पातळीवर 'गाव तेथे गोदाम' ही संकल्पना रुजविणे अत्यंत आवश्यक आहे.

**निष्कर्ष**

भारतीय अर्थव्यवस्थेत शेतकरी हा केंद्रबिंदू आहे. अगदी सुरुवातीच्या काळापासून एकूण रोजगार निर्मिती, परकीय चलनप्राप्ती औद्योगीक विकास इतयादीमध्ये शेतकऱ्यांचे मोलाचे योगदान दिले परंतु अर्थव्यवस्थेचा आधारस्तंभ व जगाचा पोशिंदा असणारा शेतकरी आपली जीवनयात्राच संपवत आहे ही गंभीर बाब आहे. म्हणजेच

"शेतकरी जन्मतो कर्जावरी।
जगतो व्याजावरी
मरतो परी कर्ज उरी
असा हा भारतीय शेतकरी।"

अशा परिसितीत शासनाने शेतकऱ्यांच्या पाठीशी गंभीरपणे उभी राहायला पाहिजे. यासाठी ध्येयवादी नेतृत्वाची, दुरदृष्टीची आणि निर्धाराची आवश्यकता आहे. भारतासारख्या देशात शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा आपला अपमान आहे. शेतकरी समाजातील नेतेच प्रामुख्याने नेतृत्त्व करति असतांना आत्महत्येचा प्रसंग शेतकऱ्यांवर यावा हे दुर्भाग्य आहे. त्यासाठी शेतकऱ्यांमध्ये आशावाद निर्माण करण्याची, शासनाच्या भूमिकेवर चिंतन करण्याची व कृषी आराखडयात बदल करण्याची नितांत आवश्यकता आहे.

**संदर्भ ग्रंथ**

१. खूपसे मार्तंड, शेतकऱ्यांच्या आत्महत्या : चिंता आणि चिंतन, समीर प्रकाशन, यवतमाळ
२. बोकरे दिवाकर, शेतकऱ्यांच्या आत्महत्या–थांबवायच्या कशा?, डायमंड पब्लिकेशन पुणे–९
३. वोरसे विश्वनाथ, शेतकऱ्यांच्या समस्या — शोध आणि बोध, वसुंधा प्रकाशन, नाशिक
४. वैध वर्षा, घुगल सुनिल, भारतातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या, सर साहित्य प्रकार केंद्र नागपूर — ३४
५. तळुले ज्ञानदेव व रसाळ ओकार, महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्येचे विविधांगी वास्तव, समाजन प्रबोधन पत्रिका — २००९ पूणे
६. अर्थविश्व–ऑक्टो. नोव्हे, डिसेंबर २०१३
७. योजना जाने २०११ Farmer sulcide in vidarbha on a decline, jan 2010
८. लोकमत ७ सप्टेंबर २०१३
९. महाराष्ट्राची आर्थिक पहाणी २००९–१०
१०. लोकराज्य जुन २०१६
११. स्वाती सेवा प्रकाशन, भारतीय कृषीशास्त्र भाग–१ श्री. गुरुपीठ त्र्यंबकेश्वर जि. नाशिक



Scanned with CamScanner

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal

# An International Multidisciplinary Quarterly Research Journal

ISSN 2277 - 5730
Volume - VIII, Issue - IV
October - December - 2019

# AJANTA

Impact Factor - 6.399 (www.sjifactor.com)

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

ISO 9001:2008 QMS
ISBN / ISSN

Is Hereby Awarding This Certificate To

ईश्वर वाघ

In Recognition of the Publication of the Paper Entitled

शेतकरी आत्महत्या आणि त्यावरील प्रतिबंधात्मक उपाय

**Ajanta Prakashan**
Jaisingpura, Near University Gate,
Aurangabad. (M.S.) 431 004
Mob. No. 9579260877, 9822620877
Tel. No.: (0240) 2400877,
ajanta5050@gmail.com, www.ajantaprakashan.com

**Editor : Vinay S. Hatole**

Scanned with CamScanner



ISSN 2277-5730

## CONTACT FOR SUBSCRIPTION

**AJANTA**
**ISO 9001: 2008 QMS/ISBN/ISSN**
**Vinay S. Hatole**
**Jaisingpura, Near University Gate, Aurangabad (M.S) 431 004,**
**Cell : 9579260877, 9822620877 Ph: 0240 - 2400877**
**E-mail : ajanta5050@gmail.com**
**Website : www.ajantaprakashan.com**

Scanned with CamScanner